




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २३९ ● पुणे ● शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




# पुण्याजवळील यवतमध्ये तणाव


## पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे गंभीर घटना टळली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजमाध्यमातील आक्षेपार्ह मजकुरामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत गावात शुक्रवारी तणाव निर्माण होऊन दगडफेक करण्यात आली. माहिती मिळताच पुणे ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. जमावाला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यवतमधील तणावाच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले.

दौंड तालुक्यातील यवत गाव परिसरात समाजमाध्यमातील आक्षेपार्ह मजकुरामुळे शुक्रवारी सकाळी ११च्या सुमारास तणाव निर्माण झाला. दोन गट समोरासमोर आले. जमावाकडून दगडफेक करण्यात आली. त्यामुळे परिस्थिती चिघळली. या घटनेची माहिती यवत पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र परिस्थिती नियंत्रणात येत नसल्याने पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालयातून अतिरिक्त कुमक मागविण्यात आली. जमावाकडून घरे, दुकाने, तसेच प्रार्थनास्थळावर दगडफेक करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. सौम्य लाठीमार करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

समाजमाध्यमात आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणारा युवक गावातील सहकारनगर भागात वास्तव्यास आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या युवकाच्या घरावर जमावाने हल्ला केला. पोलिसांनी तेथे धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. दगडफेकीत घराचे मोठे नुकसान झाले. या घटनेत कोणी जखमी झाले नाही. २६ जुलै रोजी गावात पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याची घटना घडली होती. तेव्हापासून परिसरात तणावाची परिस्थिती होती. त्यानंतर शुक्रवारी सकाळी आक्षेपार्ह मजकुरामुळे वादाची ठिणगी पडली. संतप्त जमावाने दुचाकी पेटवून दिल्या. यवत गावात पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे.



**आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करण्यात आल्यानंतर यवत गावात तणाव निर्माण झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्यास, तसेच कायदा-सुव्यवस्थेला गालबोट लावणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. – संदीपसिंग गिल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस**

### मोठा बंदोबस्त



- **गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर बंदोबस्तात वाढ करण्यात आली. शुक्रवारी गावात आठवडे बाजार असतो. तणावामुळे तो बंद ठेवण्यात आला. पोलिसांनी 'रुट मार्च' काढून जमावाला शांत राहण्याचे आवाहन केले.**
- **आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिसांच्या सायबर सेलच्या पथकाने समाजमाध्यमांवर नजर ठेवली आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्यास कारवाई करण्याचा इशाराही दिला.**



**यवतमधील व्यक्तीने समाजमाध्यमात चुकीचे स्टेटस ठेवल्यामुळे तणाव निर्माण झाला. तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे. जाणीवपूर्वक तणाव निर्माण झाला पाहिजे यासाठी काही लोक असे 'स्टेटस' ठेवून अशा घटना घडवित आहेत. संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. धर्मावर टीका करण्याचे अधिकारही कोणाला नाहीत. – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# 'कार्टूनिस्ट कम्बाइन' संस्था बोगस, व्यंग्यचित्रकारांचा आरोप

## 'जय गुजरात'च्या घोषणेने नाराजी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


'कार्टूनिस्ट कम्बाइन' संस्थेचे पदाधिकारी बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा सांगत आहेत. मात्र, बाळासाहेबांनी स्थापन केलेली मूळ संस्था बंद पडली आहे. आताची 'कार्टूनिस्ट कम्बाइन' संस्था बोगस आहे, असा आरोप काही व्यंग्यचित्रकारांनी केला आहे. 'कार्टूनिस्ट कम्बाइन'चे अध्यक्ष संजय मिस्त्री यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात 'जय गुजरात'चा नारा दिल्याने व्यंग्यचित्रकारांनी नाराजी व्यक्त केली.

गौरव सर्जेराव, रवींद्र बाळापुरे, घनश्याम देशमुख, धनराज गरड आदी व्यंग्यचित्रकारांनी याबाबत आरोप केला. 'या बोगस संस्थेच्या नावाखाली काही चार-पाच विशिष्ट व्यक्ती सगळ्या व्यंग्यचित्रकारांचे प्रतिनिधी असल्याचे भासवत आहेत. अशा बोगस संस्थेच्या अध्यक्षांनी जाहीर कार्यक्रमात दिलेल्या 'जय गुजरात'च्या नाऱ्यांनी व्यंग्यचित्रकारांची बदनामी होत आहे,' अशी भूमिका या व्यंग्यचित्रकारांनी बोलताना मांडली.

देशमुख म्हणाले, "बाळासाहेब ठाकरे यांनी १९८०-९० च्या सुमारास व्यंग्यचित्रकारांसाठी ही संस्था स्थापन केली होती. २०१३ च्या सुमारास माझ्यासह काहींनी पुढाकार घेऊन या संस्थेची कायदेशीर नोंदणी केली. नंतर लोकशाही पद्धतीने निवडणूक झाली नाही, बदललेल्या पदाधिकाऱ्यांची नोंद नाही आणि आर्थिक व्यवहारही पारदर्शक नाहीत. त्यामुळे नियमांनुसार संस्थेला आता अधिकृत मान्यता उरलेली नाही. संस्थेतर्फे होणाऱ्या कार्यक्रमांचा दर्जाही घसरला आहे."

बाळापुरे म्हणाले, "मी स्वतः उपाध्यक्ष असताना सभेचे इतिवृत्त लिहिले होते. पण, त्यावर योग्य कायदेशीर कार्यवाही झाली नाही. तीन वर्षांनंतर पदाधिकारी बदलणे अपेक्षित असताना तेच पदाधिकारी अजूनही पदावर आहेत. माझ्यासारखे लोक त्यामुळे संस्थेपासून दूर गेले आहेत. लोकांकडून पैसे उकळणे, व्यंग्यचित्रकारांना योग्य सन्मान न देणे, असे प्रकार आता संस्थेत सुरू आहेत."

'कार्टूनिस्ट कम्बाइन'चे अध्यक्ष संजय मिस्त्री म्हणाले, "कोणत्याही संस्थेत चांगले काम करत असताना चार-पाच उपद्रवी लोक त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करत असतात. चांगले काम करणाऱ्यांच्या विरोधातील ही पोटदुखी असते. आम्ही शि. द. फडणीस यांचा भव्य सत्कार सोहळा घडवून आणल्याने झालेली ही पोटदुखी आहे, त्यातून हे आरोप होत आहेत. आम्ही अधिकृत नसतो, तर शि. द. फडणीस, चारुहास पंडित, प्रशांत कुलकर्णी यांच्यासारखे व्यंग्यचित्रकार आणि चांगले आयोजक आमच्या पाठीशी उभेच राहिले नसते."



**बाळासाहेब ठाकरे यांचे सतत नाव घेऊन त्यांची संस्था आहे, असे भासवून 'जय गुजरात', 'जय राजस्थान' असे नारे देण्याने 'कार्टूनिस्ट कम्बाइन' या बोगस संस्थेच्या बोगस अध्यक्षांचा महाराष्ट्रद्रोही चेहरा उघडा पडला आहे. गुजराती धनिक मंडळी कार्यक्रमांना पैसे देतात, म्हणून नारे देण्यावरून यांची लाचारी दिसते. - गौरव सर्जेराव, व्यंग्यचित्रकार**

# नऱ्हे परिसरात मोकाट जनावरांचा मृत्यू

- **दुर्गंधीचा त्रास, आरोग्याचा गंभीर प्रश्न**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे गावातील सुविधा अंबर सोसायटीच्या मुख्य रस्त्यावर कुजलेल्या मोकाट जनावरांचे मृतदेह आढळून आले असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आरोग्याच्या धोक्याची भीती निर्माण झाली आहे.


सध्या सुरू असलेल्या पावसामुळे जनावरांचे मृतदेह भिजून सडू लागले आहेत. त्यामुळे परिसरात दुर्गंधी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. रस्त्यालगत भाजी विक्री करणारे हातगाडीवाले, छोट्या दुकानदारांना तसेच तेथून जाणाऱ्या नागरिकांना या घाणीतून जावे लागत आहे.

नागरिकांनी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे काही वेळा तक्रारी केल्या, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. मृत जनावरांचे नेमके कारण स्पष्ट नाही, मात्र त्यांची वेळेवर विल्हेवाट न लावल्यामुळे प्रशासनाच्या उदासीनतेची झलक दिसते.

**आरोग्य धोका वाढतोय**

या परिसरात लहान मुले, वृद्ध आणि महिला मोठ्या प्रमाणावर वावरत असल्याने संसर्गजन्य रोग पसरण्याचा धोका वाढला आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ सफाई मोहीम राबवण्याची व मृत जनावरे हटवण्याची मागणी केली आहे.

नऱ्हे परिसरातील वाढती घाणीची समस्या आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. आरोग्य धोक्यात येण्याआधीच महापालिकेने तातडीने कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे.



**"सुविधा अंबर परिसरात मोकाट जनावरे मृतावस्थेत आहेत. दुर्गंधीमुळे घराबाहेरही पडणे मुश्कील झाले आहे. प्रशासनाने त्वरित साफसफाई करावी."**
**– सुधीर पागडे, स्थानिक रहिवासी**

**"नऱ्हे परिसरातील मृत जनावरांवर लवकरच योग्य कारवाई केली जाईल."**
**– डॉ. सारिका फुंडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, पुणे महापालिका**

**"भाजी विक्रेत्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केले असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल."**
**– मेघा राऊत, अतिक्रमण निरीक्षक, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय**

# पुरंदरमध्ये पालखी महामार्गावर बेशिस्तपणा




**सासवड (दै. आरंभ पर्व)**

आळंदी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ९६५ वरील हडपसर-सासवड मार्गावर दिवे घाटापासून पुढील रस्त्यावर बेशिस्त हॉटेल व्यावसायिकांमुळे प्रवाशांच्या जीवावर बेतण्याचा धोका निर्माण झाला आहे. हॉटेल्सचे बोर्ड, बॅनर आणि जाहिरातींनी रस्ता दुभाजक तसेच दिशादर्शक फलक पूर्णपणे व्यापले आहेत. अनेक ठिकाणी मुख्य मार्ग आणि सेवा मार्ग यामध्ये वाहने ये-जा करण्यासाठी जागा ठेवली असल्याने यामुळे वाहतुकीला अडथळा होत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. पुणे-नाशिक महामार्गावर अशा प्रकारच्या जाहिरातींमुळे अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कठोर कारवाईची मागणी स्थानिक आणि प्रवाशांकडून होत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अशा बेकायदेशीर कृत्यांवर तत्काळ आळा घालणे आवश्यक आहे.

याबाबत या महामार्गाचे काम करणाऱ्या टी अँण्ड टी कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक राजेंद्र ढगे यांच्याशी संपर्क साधला असता, दुभाजक तसेच महामार्गावरील दिव्यांच्या खांबावरील हॉटेलचे बोर्ड आम्ही अनेकदा काढले होते. मात्र दुसऱ्या दिवशी पुन्हा ते लावले जातात. या संदर्भात हॉटेल व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

मुख्य रस्ता आणि सेवा रस्ता यामध्ये सध्या अनेक ठिकाणी असलेल्या ये-जा करण्यासाठी असलेल्या जागा बंद करण्यात येणार आहेत. ग्रामस्थ आणि व्यावसायिकांबरोबर या बाबत बैठका झाल्या असून ग्रामस्थांच्या सूचनेप्रमाणे गावच्या ठिकाणी किंवा सर्वांना सोईस्कर अशा, एक किलोमीटर अंतरावर एकाच ठिकाणी ये-जा करण्यासाठी रस्ता ठेवणार आहे. इतर ठिकाणी लोखंडी ग्रील लावून रस्ता बंद करण्यात येणार असल्याचे ढगे यांनी सांगितले.

या मार्गावरील झेंडेवाडी बस थांबा, काळेवाडी, ढुमेवाडी, दिवे येथील हायस्कूल, पवारवाडी आदी ठिकाणच्या बहुतेक हॉटेल व्यावसायिकांनी दुभाजकातच हॉटेलच्या जाहिरातींचे बोर्ड लावले आहेत. काहींनी तर महामार्गाच्या दिशादर्शक बोर्डांवरच हॉटेल्सचे बोर्ड लावल्याने प्रवाशांची दिशाभूल होत आहे.

### इतर समस्या:

- **मुख्य मार्ग आणि सेवा मार्ग यामध्ये अनेक ठिकाणी वाहने ये-जा करण्यासाठी जागा ठेवली आहे.**
- **महामार्गावरील दिव्यांचे खांब आणि दिशादर्शक फलक बॅनरच्या विळख्यात आहेत.**
- **अनेक ठिकाणी बॅनर आणि बोर्ड तुटून रस्त्यावर पडले आहेत. यामुळे रस्ता अस्वच्छ झाला असून अपघातांना निमंत्रण मिळत आहे.**

# वारजे परिसरातील वाचनालयांची दुरवस्था

## भिंती व दरवाजांवर जाहिरातींचा मारा, पायऱ्या व बाके तुटलेली

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**


वारजे परिसरातील रस्त्यावर गेल्या पाच वर्षांत पदपथावर अनेक वाचनालय उभारण्यात आली होती. त्याचा फायदा नागरिकांना काही प्रमाणात होत होता. विविध वृत्तपत्रे, मासिके नागरिक वाचत होती. मात्र, गेल्या तीन चार वर्षांत ही वाचनालये देखरेखअभावी धूळ खात पडून आहेत. सार्वजनिक पैशातून उभारलेली ही वाचनालये आज केवळ नावापुरती उरली असून, याकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. वाचनालयाच्या भिंती व दरवाजे जाहिरातींनी भरलेल्या आहेत. पायऱ्या व बाके तुटलेल्या असून, स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे. कोणतीही पुस्तके, दिवे, पंखे किंवा अभ्यास साधने उपलब्ध नाहीत. वाचनालयाचे फलक गंजलेले आहेत.

**दुरवस्था झालेल्या वाचनालये पुढीलप्रमाणे :** ज्येष्ठ नागरिक कट्टा (साई सयाजीनगर), माई मंगेशकर हॉस्पिटल सर्व्हिस रोड, कालवा रस्त्याजवळ पेट्रोल पंपाजवळ, ईशान्य नगरी ज्येष्ठ नागरिक संघ, श्रीराम सोसायटी, आकाशनगर, स्वर्गीय रामचंद्र पाटील चौधरी शाळा, आंबेडकर चौक, वारजे होम कॉलनी, कर्वेनगर गावठाण

स्थानिक नागरिक दत्तात्रेय चौधरी यांनी सांगितले की, 'वारजे भागातील वाचनालयाची देखभाल जबाबदारी ही क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत येत असून, पालिका या वाचनालयाची देखभाल दुरुस्ती करण्यात अपयशी ठरली आहे. या दुरवस्थेमुळे नागरिक वाचनालयापासून वंचित राहत आहेत. वारजे भागातील सर्वच वाचनालय तातडीने स्वच्छ, दुरुस्ती करावी.

**'शिक्षणाचा पाया' समजल्या जाणाऱ्या वाचनालयांची ही दुर्दशा ही केवळ व्यवस्थेची अकार्यक्षमता दर्शवते. प्रशासनाने ही स्थिती गांभीर्याने घेतली नाही, तर पुढील पिढ्यांसाठी वाचनसंस्कृतीच मोडीत निघण्याचा धोका आहे.**
**-राजेंद्र वाघ, ज्येष्ठ कवी**

**वाचनालयासाठी लवकरच निधी उपलब्ध होणार आहे. मोडकळीस आलेली वाचनालय दुरुस्ती केली जातील. मासिके, कादंबरी उपलब्ध करून दिली जातील. स्वच्छ वाचनालये नागरिकांसाठी लवकरच सुपूर्त करण्यात येणार आहे.**
**-दीपक राऊत, सहायक आयुक्त, वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय**





# बोटावर निभावलं!

'जीवावर बेतलेलं अखेर बोटावर निभावलं' म्हणून राज्याचे नूतन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी गुरुवारी रात्री सुटकेचा नि:श्वास टाकला असेल. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात बसले असताना कोकाटे यांनी आपल्या मोबाइलवर पत्त्यांचा डाव उघडला आणि करमणूक म्हणून 'वाईच' दोन-चार खेळ्या केल्या. त्या नेमक्या प्रेक्षक गॅलरीतून फोनच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपल्या. त्यावरून बराच गदारोळ झाला. कोकाटेंच्या जागी दुसरा कोणी असता, तर विषय एवढा चिघळला नसता. पण, कोकाटे हे व्यक्तिमत्त्वच कोणी हलक्यात घ्यावं असं नाही. त्यामुळे, सगळ्यांनीच त्यांना गांभीर्याने घेतलं आणि कोकाटे फसत गेले. विषय खोलात जातोय याचं भान कोकाटेंना फार उशिरा आलं. केवळ या प्रकरणातच असं नाही, स्वतःच्याच मिजाशीत वावरायची सवय असलेल्या कोकाटेंबाबत हे नेहमीच होतं. अगदी युवक काँग्रेसच्या दिवसांपासून त्यांच्यासोबत राहिलेले राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच सांगतात. हे सरकार आल्यापासून कोकाटे मंत्रिमंडळात आहेत. याचं कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देऊ केला म्हणून. पवार यांनी या निवडणुकीत पारंपरिक बारामती मतदारसंघाऐवजी ज्या मतदारसंघांचा विचार केला होता, त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील काही मतदारसंघांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश होता. सिन्नरची हवा जोखण्यासाठी त्यांनी या मतदारसंघात त्यावेळी लागोपाठ दौरेही केले होते. पवार यांच्या त्या मनसुब्याचे कोकाटे यांनी स्वागतच केलं होतं. आपल्या हातातला मतदारसंघ पवार यांच्यासाठी सोडण्याची बिनशर्त तयारी दाखवल्याने साहजिकच कोकाटे यांच्या गुणांत वाढ झाली.



त्यातूनच त्यांचा मंत्रिमंडळ प्रवेश नक्की झाला!

जे मनात असेल ते बोलून टाकण्यात कोकाटे मागेपुढे पाहात नाहीत. राजकारणात हा गुण बहुधा अडचणीचाच ठरतो. त्यामुळे, मंत्रिमंडळात आल्यानंतरही कोकाटे यांनी आपल्या पूर्वीच्याच लौकिकात अधिक भर टाकण्यास सुरुवात केल्यानंतर ते चांगलेच अडचणीत आले. त्यासाठी त्यांना पक्षप्रमुखांकडून खडे बोलही ऐकावे लागले. मुख्यमंत्र्यांनी उघड नाराजी व्यक्त करून झाली. पण म्हणतात ना, 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड कसं धरणार?' अगदी तशीच गत कोकाटे यांच्याबाबतही झाली. 'शेतकरी भिकारी नाही. मला तसं म्हणायचं नव्हतं. माझ्या विधानाचा विपर्यास झाला' असा खुलासा करताना कोकाटे यांनी 'शेतकरी कसला भिकारी? सरकार भिकारी' असा खुलासा करून स्वतःलाच आगीतून फुफाट्यात नेऊन टाकलं'! त्याचा धुरळा खाली बसत नाही तोवर हे पत्त्यांचं प्रकरण समोर आलं. त्यातही खुलासा करताना 'बुडत्याचा पाय खोलात' अशीच गत झाली. 'मोबाइल सुरू करताना रमीचा डाव 'पॉप-अप' झाला' या त्यांच्या खुलाशानंतर विधिमंडळाने केलेल्या तपासात त्यांच्या मोबाइलवर रमीचा डाव किती वेळ चालला होता इथपासून त्यांच्या या क्रीडानंदाचे चित्रीकरण कुठून केलं गेलं? इथपर्यंत सगळ्याच बाबी उघड झाल्या. यावेळीही केवळ तेच अडचणीत आले नाहीत. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रवक्ते, पवार - असे सगळेच अडचणीत आले. त्या सगळ्यांनीच अगदी कठोर प्रतिक्रिया दिल्या. त्यावरून 'कोकाटे यांची गच्छंती नक्की' अशा प्रकारच्या बातम्याही काही अतिउत्साही माध्यमांनी चालवल्या. पण, तसं घडणं अवघड होतं. कारण, त्याचवेळी अन्यही काही मंत्र्यांच्या तशाच वादग्रस्त बाबी सुरू होत्या. त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा औचित्यभंगाची कारवाई होण्याची चिन्हं नव्हती. जर त्यांच्यावर कारवाई नाही, तर एकट्या कोकाटेंवरच कारवाई कशी होणार? राजकारणातली गणितं आणि समीकरणं अशीच वेगळी असतात. त्यामुळे, कोकाटे वाचले. केवळ खाते बदलावर, शिक्षा म्हणून कमी महत्त्वाचं खातं स्वीकारून कोकाटेंनी स्वतःची मान सोडवून घेतली, असंच चित्र बाहेर आहे.

कोकाटे यांचं विधिमंडळाच्या सभागृहातलं गैरवर्तन केवळ रमी खेळण्याचं आहे, की सभागृहात मोबाइल वापरण्याचं आहे? सदस्यांच्या सभागृहातल्या हालचालींचं अशा प्रकारे चित्रण करणं गंभीर नाही का? या मुद्द्यांचा ऊहापोह अजूनतरी कुठे नीट झालेला दिसत नाही. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह विधिमंडळ प्रशासन आणि सभागृहालाही याचा विचार करावा लागेल. सभागृहाचे संकेत, परंपरांचं उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी खुद्द सभागृहात सुरू असतातच. त्यात सभागृहाच्या शिस्तीचा, सभागृहातील वर्तनाचा मुद्दाही विचारात घ्यावा लागणार आहे. सदस्यांनी; अनेकदा मंत्र्यांनीही एकमेकांना दिलेले 'तोंडात गुळणी धरण्याचे पदार्थ' वाहिन्यांच्या पडद्यावर दिसत असतात. सभागृहात असताना सदस्यांनी मोबाइलचा वापर करणं, काहीतरी चघळत राहाणं, प्रेक्षक सज्जातून प्रेक्षकांनी चित्रीकरण करणं, विविध गॅलऱ्यांत सुरू असलेल्या 'फ्री स्टाईल' हालचाली - या सगळ्या बाबी विधिमंडळाचं गांभीर्य घालवणाऱ्या आहेत. फार पूर्वी याबाबत पिठासीन अधिकारीच अत्यंत कडक आणि आग्रही असत. पिठासीन अधिकाऱ्यांच्या या पावित्र्यामुळे विधान भवनाची सुरक्षा यंत्रणाही अत्यंत सजग असे. प्रेक्षक सज्जातील एखादा प्रेक्षक खुर्चीत पायावर पाय टाकून बसला, वार्ताहर गॅलरीतला एखादा वार्ताहर सभागृहात बोलणारा सदस्य कोण आहे, हे पाहण्यासाठी आपल्या बाकावरून वाकला, तरी सुरक्षा रक्षकाकडून त्याला जागीच ताकद दिली जात असे. गॅलरी प्रवेशिका असूनही संकेतभंग करणाऱ्यांना सुरक्षा रक्षकांनी अनेकदा गॅलऱ्यांतून बाहेर काढलेलं आहे! विधिमंडळाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी अशा प्रकारचा आग्रह असायला हवा. तशी शिस्त लावायला हवी. ती असेल, तर कोणाचीच विधिमंडळात बसून कोणतंही आक्षेपार्ह वर्तन करण्याची हिंमत होणार नाही.

# भक्तिमय वातावरणात अवतरले 'स्वामी'

- **भैरवा फिल्म्स निर्मित 'स्वामी-२' भक्तिगीताचे दिमाखदार लोकार्पण**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'अनंतकोटी ब्रह्मांडनायक', 'जय जय स्वामी समर्थ' असा जयघोष अन भक्तिमय वातावरणात 'स्वामी' प्रेक्षागृहात अवतरले. स्वामींचा अगाध महिमा ध्वनिचित्रफितीतून मांडणाऱ्या 'स्वामी-२' या भक्तिगीताचे लोकार्पण मंगळवारी झाले. किवळे येथील एमडीएस बँक्वेट्समध्ये आयोजित सोहळ्यात स्क्रीनवर स्वामींची लीला अन प्रेक्षागृहात प्रत्यक्ष स्वामींच्या रूपातील दर्शनाची उपस्थितांनी अनुभूती घेतली.भैरवा फिल्म्स निर्मित 'स्वामी' या भक्तिगीताला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर 'स्वामी-२' या पुढील भागाची निर्मिती करण्यात आली आहे. सत्य घटनेवर व अनुभवावर आधारित या गीतामध्ये युवा उद्योजक डॉ. प्रशांत गवळी यांनी भावस्पर्शी अभिनय केला आहे. मनीष महाजन यांचे दिग्दर्शन, हर्षवर्धन वावरे यांचे गायन, नरहर राहेरकर व ब्रह्मा महाजन यांचे गीत व संगीत संयोजन यामुळे हे गाणेही 'स्वामी'सारखेच अतिशय दर्जेदार झाले आहे. डॉ. प्रशांत गवळी यांचा संघर्षमय जीवनपट या गाण्यातून उलगडला आहे. 'स्वामी-२'च्या लोकार्पणावेळी उद्योजक अविनाश तुपे, उस्मान शेख, प्रकाश मंगाने, सुदामा दास, योगिता गवळी, ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, 'स्वामी' गाण्याचे गायक अवधूत गांधी, अक्षय वाघमारे, सागर दोलताडे, अभिजित बोराटे, अभिनेता प्रतीक लाड, अरबाझ शेख, हंसराज जगताप आदी उपस्थित होते.

डॉ. प्रशांत गवळी म्हणाले, "माझ्या आईमध्ये मला स्वामी दिसतात. स्वामींची माझ्यावर मोठी कृपा आहे. स्वामींच्या छायेत, अध्यात्मिक भावनेतून आजवर काम करतो आहे. माझ्या आयुष्यात स्वामींची झालेली कृपा या गीताच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जगताना येणाऱ्या अडचणी, वेदना दूर करण्याचे काम स्वामी करतात, हे पावलोपावली अनुभवतो आहे. प्रत्येकाला प्रेरणा देणारे हे गीत आहे. पहिल्या भागाला दीड कोटींपेक्षा अधिक स्वामीभक्तांनी पाहिले आहे. या गीतालाही स्वामीभक्तांचा उदंड प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आहे."

ब्रह्मा महाजन म्हणाले, "स्वामींच्या कृपेने सर्वांचे आयुष्य आनंदी होऊ शकते. भक्तिभावाने, श्रद्धेने स्वामींची सेवा केली, तर सामान्य माणूसही कसा यशस्वी होतो, हे दाखवणारे हे गाणे आहे. पहिल्या भागाला मिळालेला प्रतिसाद आमच्यासाठी ऊर्जादायी होता. प्रशांत गवळी यांचे संघर्षमय जगणे आणि स्वामींच्या आशीर्वादाने त्यांनी केलेली वाटचाल या दोन्ही भागांमधून मांडण्याचा हा प्रयत्न लोकांना नक्की आवडेल."

## खडकवासला यशवंत विद्यालयात वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला येथील यशवंत विद्यालयात महाराष्ट्र राज्याचे मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे शहर उपाध्यक्ष (ओबीसी मोर्चा) रमेश बाप्पू गायकवाड यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात अनेक विद्यार्थी लाभार्थी ठरले. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स, दप्तर यासारखे शालेय साहित्य मोफत वाटण्यात आले. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा व त्यांचा शैक्षणिक प्रवास सुलभ करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून दत्ताभाऊ कोल्हे आणि अनिल मते यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणात मेहनत घ्यावी, पुढील वाटचालीसाठी ही छोटी मदत प्रेरणादायी ठरावी असे सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक नंदकुमार हंबीरराव फडतरे, गुरुकुल प्रमुख सौ. वैशाली येवले, श्री. हरोले जे. डी., शीतल चौरे, अमोल जानराव भिसे हे देखील कार्यक्रमासाठी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून त्यांना चांगल्या शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सौ. शीतल चौरे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी रमेश गायकवाड यांचे कौतुक करत असे उपक्रम सातत्याने राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुयोजित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होते.

या उपक्रमामुळे खडकवासला परिसरातील शैक्षणिक वातावरण सकारात्मक व प्रेरणादायी बनले असून, भविष्यात अधिक विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे मदतीचा लाभ मिळावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दहावी-बारावी परीक्षा शुल्कवाढ रद्द करावी – तानाजी कांबळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या परीक्षा शुल्कात 10 टक्के वाढ करण्याचा निर्णय 24 एप्रिल रोजी घेतला. हा निर्णय सर्वसामान्य व कष्टकरी वर्गावर अन्याय करणारा असून तो तात्काळ रद्द करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांनी केली आहे. सध्या महागाई मोठ्या प्रमाणात वाढलेली असून, शालेय वर्षाच्या सुरुवातीला आधीच वह्या-पुस्तकांचा व गणवेशांचा खर्च पालकांना भेडसावत असतो. त्यात परीक्षा शुल्कात वाढ झाल्यामुळे अनेकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शेतमजूर, मोलमजुरी करणारे पालक परीक्षा फॉर्म भरण्याच्या वेळी उसनवारी करतात, ही बाब शासनाने गांभीर्याने घ्यावी. शिक्षण सर्वांसाठी सुलभ व



सुलभ असावे, हे सरकारचे धोरण असताना परीक्षा शुल्कवाढ करून पालकांवर भार टाकणे हे चुकीचे आहे. तानाजी कांबळे यांनी मागणी केली आहे की, शासनाने तातडीने हा निर्णय मागे घ्यावा आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क पूर्णतः माफ करावे किंवा नाममात्र ठेवावे, जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण आर्थिक कारणांमुळे थांबू नये.

## प्रमोद कापसे यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीसपदी नियुक्ती



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात सक्रिय असलेल्या प्रमोद सुरेश कापसे यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच जिल्ह्यातील कृषी पदवीधरांच्या संघटनेचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र प्रदान केले असून, त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया देताना प्रमोद कापसे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारसरणीवर विश्वास ठेवून काम करणार असून, जिल्ह्याच्या विकासात कार्याचा ठसा उमटवणार आहे." त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रांताध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे आभार मानले. शेतकरी, कृषी पदवीधर, उद्योजक, अधिकारी, शासकीय व कंत्राटी कर्मचारी यांच्यासाठी प्रभावी भूमिका बजावण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. प्रमोद कापसे हे ज्योतिबाची वाडी येथील असून, त्यांचे वडील सुरेश कापसे यांनीही सामाजिक व राजकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. या निवडीबद्दल जिल्हाभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




# शालेय साहित्य व 'फकिरा' कादंबरीचे वाटप

**कोथरूड (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीर, साहित्यसम्राट आणि समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांच्या 105व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष कोथरूड मध्य मंडळाच्या वतीने शास्त्रीनगर येथील अण्णासाहेब पाटील शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले, तसेच भारतीय संविधानाची प्रत आणि अण्णाभाऊ साठे लिखित 'फकिरा' कादंबरीचे वाटप




करण्यात आले. माजी नगरसेवक दिलीपअण्णा वेडेपाटील यांच्या हस्ते हा उपक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना दिलीपअण्णा वेडेपाटील म्हणाले की, "अण्णाभाऊ साठे हे केवळ लेखक नव्हते, तर ते दलित, शोषित आणि वंचित समाजाच्या आशा-आकांक्षांचे प्रखर प्रतिनिधी होते. त्यांचे साहित्य आजही समाज परिवर्तनासाठी प्रेरणा देणारे आहे."


या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या प्रगल्भ विचारांचा व प्रेरणादायी साहित्याचा जागर करण्यात आला. या प्रसंगी कोथरूड मध्य मंडळ भाजपा अध्यक्ष श्री. निलेशजी कोंढाळकर, इतर पदाधिकारी, शाळेचे सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# थोडक्यात



## प्राज भिलारे यांचा युवा सन्मान पुरस्कार देऊन गौरव

**धायरी (आरंभ पर्व) : लोकमान्य टिळक जयंती उत्सव 2025 निमित्त, लोकमान्य स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने देण्यात येणारा युवा सन्मान पुरस्कार धायरीतील शिववंदना मित्रपरिवाराचे संस्थापक, श्री प्राज भिलारे यांना देण्यात आला. परसिस्टंट आयटी कंपनी चे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे तसेच सुप्रसिद्ध अभिनेत्या मृणाल कुलकर्णी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार भरत नाट्य मंदिर, पुणे येथे प्रदान करण्यात आला. यावेळी कुणाल टिळक हे देखील उपस्थित होते. शिववंदना मित्रपरिवाराच्या माध्यमातून प्राज भिलारे यांनी अनेक विधायक कामे राबवली असून त्यामध्ये मोफत ॲम्ब्युलन्स सेवा, रक्तदान शिबिरे, लहान मुलांसाठी किल्ले स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच धायरीमध्ये विविध भागात नियमित शिववंदना उपक्रम, तरुणांसाठी गड दर्शन, आदींचा समावेश आहे. कार्यक्रमाचे संयोजक आशिष जोशी यांच्या प्रयत्नातून हा सत्कार करण्यात आला.**



## लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**खडकवासला (आरंभ पर्व) : मनपा शाळा खडकवासला क्रमांक ०१ येथे आज लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर भाषणांनी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर आधारित सादरीकरणाने झाली. शिक्षकांनीही प्रेरणादायी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. नवनाथ कुंभारकर सर यांनी केले. अध्यक्षीय भाषण मुख्याध्यापक श्री. अमोल माने सर यांनी दिले. त्यांनी दोन्ही महापुरुषांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचे शेवटी श्री. अजमीर मुलाणी यांनी आभार प्रदर्शन करून समारोप केला.**



## वडगाव-धायरी परिसरात डायग्नोस्टिक सेंटर स्थापनेची मागणी

**धायरी (आरंभ पर्व) : वडगाव धायरी परिसरातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी पुणे महापालिकेच्या मुरलीधर लायगुडे दवाखान्यामध्ये डायग्नोस्टिक सेंटरची उभारणी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले व श्री. सारंग नवले यांनी केली आहे. या सेंटरमध्ये अत्यल्प दरात एम.आर.आय, सिटी स्कॅन, एक्स-रे यांसारख्या अत्यावश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंतीही त्यांनी केली. यासंदर्भातले निवेदन पुणे महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम यांना देण्यात आले. माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांनी सांगितले की, धायरीसह परिसरातील नागरिकांना तपासणीसाठी लांब जावे लागते. त्यामुळे स्थानिक पातळीवरच उच्च दर्जाच्या वैद्यकीय तपासणी सेवा उपलब्ध झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.**

## थोडक्यात



### नांदेड सिटी येथे डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे विशेष मार्गदर्शन

पुणे (आरंभ पर्व) : "सुलभ वजन घटवणे आणि औषधाविना मधुमेह नियंत्रण" या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सुप्रसिद्ध आरोग्य तज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे स्फूर्तीदायक मार्गदर्शन रविवार, ३ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० ते १०.०० या वेळेत हार्टफुलनेस ध्यान केंद्र, नांदेड सिटी, पुणे येथे होणार आहे. हा कार्यक्रम पवार पब्लिक स्कूल व आम्फीथिएटर शेजारी आयोजित करण्यात आला असून, सुरुवात हार्टफुलनेस ध्यानाने होईल. ही ध्यानपद्धत ही एक प्रभावी यौगिक साधना असून, हृदयावर लक्ष केंद्रित करत मानसिक शांती, भावनिक स्थैर्य आणि आत्मिक उन्नती साध्य करण्यास मदत करते. जगभरातील लाखो लोकांनी या ध्यानपद्धतीचा अनुभव घेतला आहे. हार्टफुलनेस संस्थेचे मार्गदर्शक श्री कमलेशजी पटेल (दाजी) यांच्या प्रेरणेतून हे ध्यान मोफत शिकवले जाते. प्रशिक्षित मार्गदर्शकांमार्फत हे प्रशिक्षण संपूर्ण भारतासह अनेक देशांमध्ये दिले जाते. आरोग्यदायी जीवनशैली, योग्य आहार, नियमित ध्यान आणि सकारात्मक विचारसरणी यामुळे वजन कमी होणे व मधुमेहावर नियंत्रण शक्य आहे, असा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिला जाणार आहे. नांदेड सिटी आणि पुणे परिसरातील नागरिकांनी या आरोग्यदायी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. संपर्क : श्री. रघु विडप – ९९७५५०६१७५ श्रीमती स्नेहा करमरकर – ९६८९६४८०३३



### संघ प्रचारक बापू पंचवाघ यांचे निधन

पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक बापू पंचवाघ (वय ९१) यांचे निधन झाले. सिंहगड रस्ता परिसरातील पंचवाघ यांनी आयुष्यभर संघकार्याला समर्पित जीवन जगले. त्यांच्या निधनाने संघपरिवारासह परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे. संघाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. संयमित, सुसंस्कारित आणि राष्ट्रभक्त व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जात. त्यांच्या विचारांमुळे अनेक कार्यकर्ते घडले. सामाजिक, शैक्षणिक आणि संस्कारक्षम कार्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्यावर त्यांनी राजकीय जडणघडणीत मार्गदर्शकाची भूमिका निभावली होती. त्यांच्या निधनाबद्दल ॲड .प्रसन्नदादा जगताप यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. पंचवाघ यांच्यावर आज रात्री साडेनऊ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दहावा विधी ८ ऑगस्ट रोजी ओंकारेश्वर येथे होणार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.



### अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

बार्शी (आरंभ पर्व) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सारोळे ता .बार्शी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनाचे आणि सामाजिक योगदानाचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या माजी उपसरपंच हरिनाना मोरे, यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी माजी सरपंच बाळराजे गाटे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे महत्त्व सांगताना, त्यांचे लेखन आणि लोकजागरणाचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. माजी उपसरपंच हरिनाना मोरे, बालाजीभाऊ निचळ यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमाला मोहनअण्णा गाटे, कल्याण अण्णा पाटील, सुशांत भैय्या पाटील सुधाकर जाधव, प्रदीप जाधव, शशिकांत गाटे, अंगणवाडी सेविका प्रतिभा साबळे, प्रमिला मुंबरे, ग्रामपंचायत शिपाई विजय महापुरे, लक्ष्मण ठोंबरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

# शालेय साहित्य वाटप व वाचनालयाचे उद्घाटन

## अखिल धायरी गाव अण्णाभाऊ साठे युवा संघटनेतर्फे २९व्या वर्षी सामाजिक उपक्रमांतून जयंती उत्सव

**लक्ष्मण साबळे**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातील वंचित, गरीब आणि उपेक्षित घटकांसाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105व्या जयंतीनिमित्त अखिल धायरी गाव अण्णाभाऊ साठे युवा संघटनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या वर्षी या उपक्रमाचे सलग २९वे वर्ष असून, जयंतीनिमित्त गावातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी साहित्य वाटप ही केवळ मदत नसून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेला एक सकारात्मक हातभार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

यासोबतच मंडळाच्यावतीने नव्याने उभारण्यात आलेल्या वाचनालयाचे उद्‌घाटनही उत्साहात पार पडले. या वाचनालयात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त अशी विविध साहित्ये, पुस्तके व मासिकांचा संग्रह उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमामुळे नव्या पिढीमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागेल, असे मत मान्यवरांनी मांडले.

यावेळी अनेक वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "केवळ दीड दिवस शाळा शिकलेला माणूस, ज्याचे साहित्य रशियातील संग्रहालयात ठेवले गेले, ही संपूर्ण भारतासाठी अभिमानाची बाब आहे. अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालाच पाहिजे," अशी जोरदार मागणी या वेळी करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून, काकासाहेब चव्हाण, श्रीरंग नाना चव्हाण, मिलिंदभाऊ पोकळे, राहुल पोकळे, गंगाधर भडावळे,किशोर पोकळे, बापूसाहेब पोकळे, माजी सरपंच आशाताई बेनकर, विनायक बेनकर, शिवाजी मते, अतुल चाकणकर, संदीपभाऊ पोकळे, विकास कामठे, सागर लोणारे, सोमनाथ लोणारे, श्रीकांत लोणारे, सूर्यकांत लोणारे, संतोष लोणारे, नितीन लोणारे, तुकाराम लोणारे, अर्जुन लोणारे, नंदू लोणारे, शुभम आडगळे, कुंडलिक लोणारे, सनी लोणारे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत अण्णाभाऊ साठे यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम मंडळाकडून सातत्याने केले जात आहे.

या निमित्ताने समाजमनात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा एक प्रेरणादायी पायंडा निश्चितच निर्माण झाला आहे.

## अनधिकृत पत्राशेडवर कारवाई



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह विभागाकडून शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. या कारवाईअंतर्गत धायरी फाटा परिसरातील नवले शाळेसमोरील अनधिकृत पत्रा शेड हटविण्यात आले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही केवळ सुरुवात असून पुढील काळात अशा प्रकारच्या अनधिकृत शेड, दुकाने, फलक यावर अधिक कठोर पावले उचलली जाणार आहेत. यामुळे शहरातील अतिक्रमण हटविणे, सुरक्षितता वाढविणे आणि सौंदर्य वाढविणे हे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. परिसरातील नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी आपली अनधिकृत बांधकामे स्वखुशीने हटवावीत, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या या पावलाचे परिसरात समाधान व्यक्त होत असून, नियमबाह्य शेड व फलकांमुळे होणाऱ्या गैरसोयी कमी होणार असल्याची अपेक्षा आहे.

## नांदेड सिटी विद्युत केंद्रातून वीजपुरवठ्याची मागणी

- **शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे व कोपरे परिसरातील वीजपुरवठ्याच्या समस्येकडे सचिन दांगट यांचे लक्ष**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे व कोपरे या परिसरांतील वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक व व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. या समस्येची गंभीर दखल घेत सचिन विष्णुपंत दांगट (सभासद – पुणे मनपा 34 गावे सुधारणा समिती, महाराष्ट्र शासन) यांनी कोथरूड विभागाचे कार्यकारी अभियंता विद्युत यांना पत्राद्वारे कारवाईची मागणी केली आहे.

या भागात वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, कामगार वर्ग तसेच लघुउद्योजक आणि व्यावसायिक यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सतत वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे औद्योगिक कामकाजावरही परिणाम होत असून उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर सचिन दांगट यांनी कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्रात एक महत्त्वपूर्ण उपाय सुचवला आहे. नांदेड सिटीमध्ये असलेल्या मोठ्या विद्युत उपकेंद्रातून शिवणे, कोंढवे धावडे, उत्तमनगर आणि कोपरे परिसरात वीजपुरवठा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. या उपकेंद्रातून जर वीजपुरवठा मिळाला, तर या परिसरातील लाईट जाण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर कमी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दांगट यांनी सांगितले की, या प्रश्नावर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात फोन आणि तक्रारी येत आहेत.

त्यामुळे हा प्रश्न शासन दरबारी नेऊन योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नागरिकांना स्थिर वीजपुरवठा मिळावा, यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू केला आहे. या कारवाईमुळे लवकरच या भागातील वीज समस्येवर ठोस उपाय मिळण्याची अपेक्षा नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# आमदार भिमराव तापकीर यांच्या हस्ते धायरीत रस्त्याचे लोकार्पण

## बाप्पूसाहेब पोकळे यांचा पाठपुरावा यशस्वी : आधी काम नंतर उद्‌घाटन बापूसाहेब पोकळे यांचा नवा आदर्श




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील पासोडी भागात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचे अखेर काम पूर्ण होऊन, आमदार भिमराव तापकीर यांच्या हस्ते भव्य लोकार्पण सोहळा पार पडला. हा रस्ता खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि आमदार तापकीर यांच्या १० लाख रूपयांच्या आमदार निधीमधून पूर्ण करण्यात आला. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी आमदार तापकीर व बापूसाहेब पोकळे यांचे मन:पूर्वक आभार मानले. या प्रसंगी आमदार तापकीर आणि बापूसाहेब पोकळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मा. सरपंच रोहिणी जगताप, जेष्ठ नागरिक माऊली शेवाळे, प्रभाग अध्यक्ष पै. तुषार पोकळे, रोहिणी रहाणे, नवनाथ रायकर, राहुल बांदल, प्रकाश रासकर, ॲड. सुनील दळवी, निलेश हंगे, संतोष चंदनशिव, बाळासाहेब बेलकर आणि इतर मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तुषार श्रीहरी पोकळे यांनी केले.

धायरीतील नागरिकांना या रस्त्याची प्रतिक्षा अनेक वर्षांपासून होती. पावसाळ्यात चिखल, धूळ आणि खड्ड्यांमुळे होणारा त्रास आता संपुष्टात आला आहे. नव्याने बांधलेल्या या रस्त्यामुळे रहदारी सुलभ होणार असून स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या लोकार्पण सोहळ्याचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे बापूसाहेब पोकळे यांनी राबवलेला नवीन पॅटर्न. "रस्त्याचे भूमिपूजन न करता थेट लोकार्पण करून कार्यक्रम आयोजित करणे" हा त्यांनी अवलंबलेला आदर्श उपक्रम उपस्थितांच्या विशेष चर्चेचा विषय ठरला. या उपक्रमातून "काम आधी – उद्‌घाटन नंतर" हा संदेश जनतेसमोर ठेवत त्यांनी एक सकारात्मक पायंडा पाडला आहे. लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्षात विकासकामे करून त्याचे श्रेय घ्यावे, ही यामागील प्रेरणा होती, असे बापूसाहेब पोकळे यांनी स्पष्ट केले.

भाजपच्या नेतृत्वाखाली होत असलेली ही विकासाची वाटचाल सामान्य नागरिकांपर्यंत पोहचत आहे, हे या प्रसंगी स्पष्ट झाले. आमदार तापकीर यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, "धायरी परिसरात आम्ही विविध विकासकामांसाठी कटिबद्ध आहोत. नागरिकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच आम्ही आज हे कार्य पूर्ण करू शकलो."

कार्यक्रमाचे नियोजन आणि उत्साही वातावरण पाहता, स्थानिकांच्या मनात विकास कामांबद्दल सकारात्मकता वाढलेली दिसली. या रस्त्याच्या लोकार्पणाने धायरीतील पायाभूत सुविधा अधिक मजबूत होणार आहेत आणि भविष्यात अजूनही अशी अनेक कामे मार्गी लावण्याचे आश्वासन आमदार तापकीर व पोकळे यांनी दिले. या लोकार्पण सोहळ्याने धायरीतील विकासाच्या वाटचालीला नवे दिशा दिली असून, प्रामाणिक कार्य आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोनामुळेच बापूसाहेब पोकळे यांचे आश्वासक नेतृत्व लोकांपर्यंत पोहोचत आहे, असेच चित्र या कार्यक्रमात दिसून आले. या कामासाठी निधी दिल्याबद्दल बापूसाहेब पोकळे यांनी आमदार भीमराव तापकीर यांचे आभार मानले. व आगामी काळामध्ये ही विकास कार्यासाठी असेच सहकार्य पाठीशी असावे अशी विनंती पोकळे यांनी यावेळी केली. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

# मिलिंद पानसरे यांची आरपीआय पुणे शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती

## पक्ष संघटनात नवा उत्साह; सामाजिक चळवळीतील कार्याची दखल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे सिंहगड रोड परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार मिलिंद पानसरे यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पुणे शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली असून नुकतेच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

गेल्या तीन दशकांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या पानसरे यांनी विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजात जनजागृती घडवून आणण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ते आपल्या कार्यातून सातत्याने समाजापर्यंत पोहोचवत आले आहेत.

त्यांच्या पुढाकारातून अनेक बेघरांना घरे मिळवून देण्यात आली, शेकडो बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच, युवकांना सामाजिक कार्यात भाग घेण्यासाठी प्रेरित करण्याचे कार्य त्यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे. अन्याय आणि अत्याचाराविरोधात नेहमी आवाज उठवणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे विचार समाजाच्या तळागाळात पोहोचवण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा भिम फेस्टिव्हल सिंहगड रोड परिसरातील जे पी नगर व नांदेड येथे सामाजिक कार्यकर्ते सिद्धू कांबळे यांच्या सहकार्यातून आयोजित करण्यात आला होता. विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने, मोर्चे, निदर्शने आयोजित करण्यात आली आहेत.

पानसरे हे सर्व जाती-धर्मातील लोकांना बरोबर घेऊन सामाजिक जयंती उत्सवात सक्रीय सहभाग घेतात. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल विविध संस्थांनी घेतली असून अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

त्यांच्या या नियुक्तीमुळे पुणे शहरात आरपीआयच्या संघटनात्मक बांधणीस नवे बळ मिळेल आणि पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे राबवता येईल, असा विश्वास पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून विविध स्तरातून त्यांना अभिनंदन संदेश दिले जात आहेत.



**आपल्या ध्येयाविषयी बोलताना पानसरे म्हणाले, "निस्वार्थीपणे समाजसेवा करणे, अन्यायाविरोधात आवाज उठवणे, नव्या पिढीला योग्य मार्गदर्शन करणे, लोकशाही बळकट करणे आणि माणुसकीचा व सामाजिक सलोख्याचा प्रचार करणे हेच माझे ध्येय आहे."**



# धायरीतील धारेश्वर मंदिरातील स्वयंभू शिवलिंगाचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व

**लेखन : मा. श्री. लक्ष्मण साबळे, पुणे (निवासी संपादक)**



**(दै. आरंभ पर्व)**

पुणे शहराच्या पश्चिमेकडे वसलेला धायरी परिसर गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित झाला असला, तरी या भागात असलेले धारेश्वर मंदिर आजही आपली प्राचीनता, पावित्र्य आणि आध्यात्मिकतेचा ठसा अभिमानाने जपून आहे. हे मंदिर केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर शिवभक्तांची श्रद्धा आणि इतिहासाचा साक्षीदार ठरलेले एक महत्त्वाचे स्थान आहे.

**स्वयंभू शिवलिंग – जिथे श्रद्धा आणि अनुभव एकत्र येतात**

धारेश्वर मंदिरातील शिवलिंग हे स्वयंभू आहे, म्हणजेच ते जमिनीच्या पोटातून नैसर्गिक रित्या प्रकट झाल्याचे मानले जाते. या शिवलिंगाच्या उत्पत्तीबद्दल स्थानिकांच्या अनेक श्रद्धा आणि आख्यायिका आहेत. अनेक भक्त असे सांगतात की, या जागेवर ध्यानधारणा करताना त्यांना चमत्कारिक अनुभूती झाली आहे. हे शिवलिंग कोणत्याही मानवनिर्मित हस्तकलेशिवाय नैसर्गिक रूपात असल्यामुळे त्याला अधिक पवित्र मानले जाते.

**शिवकालीन वारसा – इतिहासात उमटलेले धारेश्वरचे अस्तित्व**

स्थानिक इतिहासप्रेमींनुसार, हे मंदिर शिवकालीन म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील आहे. मंदिराची रचना, त्यातील शिल्पकला, व स्थापत्यशैलीवरूनही त्याचा पुरातन व धार्मिक महत्त्व सहजपणे लक्षात येते. परिसरातील जुन्या वयोवृद्ध नागरिकांच्या सांगण्यानुसार, या मंदिराला पूर्वीपासूनच विशेष मान्यता होती आणि अनेक राजे, सरदार, व साधू-संत येथे नियमितपणे दर्शनाला येत असत.

**श्रावण महिन्यातील उत्साह – भक्तांसाठी पर्वणी**

श्रावण महिना म्हटला की शिवभक्तांचा उत्सव. धारेश्वर मंदिरात दरवर्षी श्रावण महिन्यात विशेष पूजाविधी, अभिषेक, रुद्रपठ, आरत्या आणि धार्मिक कीर्तनांचे आयोजन केले जाते. विशेषतः सोमवारी आणि महाशिवरात्रीच्या दिवशी येथे भक्तांची प्रचंड गर्दी उसळते. अनेक भाविक उपवास करून, डोक्यावर जलकुंभ घेऊन येथे पायी वारी करत दर्शन घेण्यासाठी येतात. हे दिवस मंदिर परिसरात खूपच भाविकमय वातावरण निर्माण करतात.

**नूतनीकरण आणि सौंदर्यीकरण – आधुनिकतेचा स्पर्श, परंपरेची जोपासना**

अलीकडेच मंदिराचे सौंदर्यीकरण आणि नूतनीकरण करण्यात आले असून, हे काम मंदिर ट्रस्ट आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने पार पडले. मंदिर परिसर आता अधिक स्वच्छ, सुशोभित आणि भाविकांसाठी अनुकूल झाला आहे. नव्याने तयार केलेल्या मंडपात भक्त शीतल सावलीत पूजा करू शकतात. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे, वीज आणि लाइटिंगची सोय यामुळे मंदिराचा अनुभव आणखी सुखद झाला आहे.

**श्रद्धेच्या कक्षा वाढवणारे धारेश्वर मंदिर**

धारेश्वर मंदिर हे केवळ एक स्थानिक देवस्थान राहिलेले नाही. पुण्यातील अनेक भाविक दर रविवारी, श्रावण सोमवारी किंवा विशेष दिनी येथे आवर्जून येतात. पवित्रता, नैसर्गिक निसर्गरम्यता, आणि अध्यात्मिक शांतता या त्रिसूत्रांमुळे हे मंदिर भक्तांच्या मनात अढळ स्थान निर्माण करत आहे.

धायरी परिसराचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व वाढवणारे हे मंदिर भविष्यात एक प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून उदयास येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्रद्धा, इतिहास आणि समर्पण या त्रिसूत्रीने भारलेले धारेश्वर मंदिर आज पुणेकरांच्या हृदयात एक वेगळं स्थान निर्माण करत आहे.

## थोडक्यात



### सेवा रस्त्याचा मेवा घेतात टँकर चालक; महामार्गावरील परिस्थिती

- हिंदुस्तान पेट्रोलियमच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पुणे-सोलापूर महामार्गावर कदमवाकवस्ती येथे हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशनचे टर्मिनल असून त्यातील टँकर सेवा रस्त्यावर लावल्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्या दुचाकी व चार चाकी वाहनांना अडथळा होत आहे. सेवा रस्ता म्हणजे पार्किंगची सोय असल्याच्या अविर्भावात खुशाल टँकर चालक टँकर लावून निवांत होताना दिसत आहे .एच पी गेटच्या समोरील सेवा रस्त्यावर टँकर चालकाने टँकर लावलेल्या शेजारी खड्डा असल्यामुळे दुचाकीस्वार टँकर पर्यंत येऊन माघारी जात होते. त्यामुळे महामार्गावर वाहतुकीचा ताण येत असुन सतत वाहतूक कोंडी होत आहे. यावर प्रशासनाचा कसल्याही प्रकारचा अंकुश राहिला नसल्याचे दिसून येत आहे. कारणाने अपघातात वाढच होत आहे.कदमवाकवस्ती येथील सेवा रस्ता तर हिंदुस्थान पेट्रोलियम टर्मिनल साठीच बनवला आहे का ? असे नागरिक बोलून दाखवतात. येथे नागरिकांच्या साठी सेवा रस्ता नसुन टँकरवाल्यांनसाठी मेवा रस्ता असल्याचे दिसून येत आहे .टर्मिनलचे अधिकारी आमचाच सेवा रस्ता असल्याच्या आर्विभावात वागत आहे .त्यामुळे नागरिकांच्या मनात चीड निर्माण झाली आहे.



### अट्टल घरफोडी चोरास मध्यप्रदेश येथुन केली अटक

- ६,३९,९००/- रुपयांचे सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोबाईल केला जप्त.

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : घरात कोणी नसल्याचा फायदा घेत कुलूप तोडून सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरट्याने पळविण्याचा गुन्हा लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून गुन्हेगारास खंडवा मध्य प्रदेश येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडील मुद्देमाल जप्त केल्याचे लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सांगितले. दिनांक १२/०७/२०२५ रोजी सकाळी ११/०० सुमारास इसम नामे श्री शौकत शब्बीर मोगल वय ४३ वर्षे रा. गल्ली नंबर २, पठारे वस्ती, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे हे त्यांचे कुटुंबीयांसह त्यांचे राहते घरास कुलुप लावुन बार्शी येथे गेले होते. दि. १४/०७/२०२५ रोजी ते घरी परत आले असता, त्यांच्या घराचे कुलुप तुटलेल्या अवस्थेत तसेच त्यांच्या घरातील लोखंडी कपाटाचे व आतील तिजोरीचे लॉक उचकटलेले व त्यातील सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोबाईल फोन चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याबाबत त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाणेस दि. १५/०७/२०२५ रोजी अज्ञात चोरटयांविरुध्द घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्हयाच्या तपासादरम्यान लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील तपास पथकाचे अंमलदार पो. शि. पाटील व पो. शि. कुदळे यांनी माहितीच्या आधारे अज्ञात आरोपीचे ठावठिकाणाबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त केली. त्यावरुन प्रतिक हिराचंद लिडकर वय ३१ रा. शिवमंदिर शेजारी रामनगर, खंडवा, ता. जि. खंडवा, मध्यप्रदेश याने ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले . त्यानंतर वरिष्ठांचे मार्गदर्शन व परवानगीने लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे स्वतंत्र पथक खंडवा, मध्यप्रदेश येथे तात्काळ रवाना झाले व त्यांनी अतिशय कौशल्यपुर्णरित्या सापळा रचुन आरोपीस लोणी काळभोर पोलीसांनी खंडवा, मध्यप्रदेश येथुन दि. २३/०७/२०२५ रोजी ताब्यात घेतले . त्याच्या विरुद्ध मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यात चोरी, घरफोडी, जबरी चोरी अशाप्रकारचे एकुण १५ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

## ‘पीएमपी’चा पुन्हा नव्या दिशेने प्रवास !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर, पिंपरी - चिंचवड आणि जिल्ह्यात सार्वजनिक वाहतुकीची सेवा पुरविणाऱ्या पीएमपीचे अध्यक्षपद, खरं तर ही एक चांगली पोस्टिंग समजली जाते. डॉ. श्रीकर परदेशी, तुकाराम मुंडे, डॉ. राजेंद्र जगताप, ओमप्रकाश बकोरिया, सचिंद्र प्रतापसिंग आदी अधिकाऱ्यांनी ते सिद्ध करून दाखविले. त्याच मार्गावर नवनियुक्त अध्यक्ष पंकज देवरे यांची आता वाटचाल सुरू झाली आहे. पदभार स्वीकारल्यावर निर्णय घेण्याचा त्यांनी झपाटा लावला आहे. पीएमपीचा ‘प्रवास’ शाश्वत इंधन वापरण्यापुरताच मर्यादित न ठेवता पीएमपी कायमस्वरूपी आर्थिकदृष्ट्या सशक्त करण्यासाठी त्यांनी वेगाने हालचाली सुरू केल्या आहेत. पदभार स्वीकारल्याच्या पहिल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पीएमपीच्या प्रश्नांसंदर्भात त्यांनी बैठकीची वेळ मागितली आहे. हे करीत असतानाच स्थानिक पातळीवर ठेकेदारांना सज्जड दम देत प्रवासी हेच आमचे प्राधान्य असल्याचे ठेकेदारांना ठणकावून सांगितले. पीएमपीचा कणा हा कर्मचारी आहे. त्यांना विश्वासात घेऊन प्रशासनाने वाटचाल केली पाहिजे, अशी कर्मचाऱ्यांची अपेक्षा आहे. त्याकडे नव्या दमाच्या अधिकाऱ्यांनी पाहिले तर, पीएमपीच्या प्रगतीचा आणि सक्षमतेचा प्रवास वेगाने होऊ शकतो. पीएमपी पुण्यातील सार्वजनिक वाहतुकीचा कणा असलेली संस्था. दररोज सुमारे १२ लाखांहून अधिक प्रवासी पीएमपीच्या बसने प्रवास करतात. ब्रेकडाऊन, ठेकेदारांची मनमानी, बसचे विस्कळित वेळापत्रक ठीक करण्याच्या प्रश्नांनीच आतापर्यंतच्या अध्यक्षांचा घाम काढला.

## तडफदार नेतृत्वाने घडवले विकासाचे नवे पर्व

- पडसाळीचे तरुण सरपंच समाधान रोकडे ठरले आदर्श



**लक्ष्मण साबळे, पुणे**

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक जाणीवेने प्रेरित, लोकहिताचे भान राखणारे, आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणजे पडसाळी (ता. उत्तर सोलापूर) गावाचे ३३ वर्षीय तरुण सरपंच समाधान रोकडे. आज संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात त्यांच्या नावाची चर्चा होत आहे आणि यामागे आहे त्यांनी केलेली वैविध्यपूर्ण, ठोस आणि सर्वसमावेशक कामगिरी.

समाधान रोकडे यांचा सामाजिक व पत्रकारितेचा भक्कम पाठींबा त्यांच्या नेतृत्वशैलीत झळकतो. त्यांनी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करून ग्रामीण नेतृत्वाला एक नवा आयाम दिला आहे.

**विकास कामांची ठळक वैशिष्ट्ये :**

संजय गांधी,श्रावण बाळ योजना तसेच इंदीरा गांधी राष्ट्रीय वृद्धपकाळा योजना अंतर्गत गावात अनेक वृद्धांना अनुदान प्राप्त करण्याचा पुढाकार

रमाई घरकुल व मोदी आवास,पंतप्रधान आवास योजना यामार्फत अनेक कुटुंबांना निवारा

बौद्ध वस्ती सुधारणा, भीमनगर मंदिर, व हनुमान मंदिर यांचे सौंदर्यीकरण

सौर उर्जेवर आधारित दिवे, विशेषतः संत नरसोबा मंदिर परिसरात हायमास्ट दिवा

पिण्याच्या पाण्यासाठी टाकी, महिलांसाठी जलसुविधा

जिल्हा परिषद शाळेत मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, मुलांसाठी खेळते मैदान आणि फ्लेवर ब्लॉक बसविणे

समाधान रोकडे यांनी गावातील प्रत्येक घटकासाठी काम करण्याचा निर्धार घेतला आहे. महिला बचतगट, तरुण मंडळ, शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवून गावाला पुढे नेण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत आहेत.

जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष काकासाहेब साठे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना गावपातळीवर जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

समाधान रोकडे हे केवळ सरपंच नाहीत तर गावाचा सेवक म्हणून ओळखले जात आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे पडसाळी गावाचा चेहरामोहरा बदलत आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आणि सामाजिक दृष्टिकोनाचा सर्वांना अभिमान वाटतो.

## क्रांतिकारी कन्या मुक्ता साळवे सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**लो. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सर्वपक्षीय नेत्यांचे अभिवादन!**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मातंग समाज सेवा ट्रस्ट, कोथरूड यांच्यातर्फे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या 105 व्या जयंतीनिमित्त अभिवादन तसेच सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन सोहळा सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना, विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळवा, यासाठी हे सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले. उद्घाटना प्रसंगी माजी नगरसेवक किशोर शिंदे, दिलीप वेडे पाटील, शहराध्यक्ष शिवसेना उबाटा गजानन थरकुडे, उत्कर्ष बँकेचे गुरुप्रीत सिंग, शहराध्यक्ष पती पवन संघटना श्रीकांत शिळीमकर, चंदुशेठ कदम, नवनाथ जाधव, मंदार जोशी, मातंग समाज सेवा ट्रस्ट अध्यक्ष विजय बापू डाकले तसेच आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयंतीच्या निमित्त दहावी आणि बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, त्याचबरोबर दहा हजार समाज बांधवांसाठी मिसळचेही आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ समाजातील सर्व नागरिकांनी घेतला. कोथरूड परिसरात लो. अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारण्याचा ठराव यावेळी करण्यात आला, त्याला सर्वानुमते मान्यता ही मिळाली. कोथरूड मतदार संघामध्ये धर्माच्या जातीपातीच्या नावावर सुरू असलेल्या राजकारण टाळून महापुरुषांच्या विचाराने वाटचाल करू तसेच भविष्यात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवू असे मत विजयबापू डाकले यांनी जयंतीच्या निमित्ताने व्यक्त केले.

## महामार्ग की गटार लाईन प्रशासन करते याकडे डोळेझाक

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**



पुणे - सोलापूर महामार्गावर द्राक्ष बागेशेजारी मांजरी फाटा येथे सांडपाणी वाहत असुन त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पुणे सोलापूर महामार्गावर मांजरी फाटा ( द्राक्ष बागेशेजारी ) गटाराचे सांडपाणी वाहत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. सार्वजनिक आरोग्य आणि वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.गेल्या काही आठवड्यांपासून पुणे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून सतत गटाराचे पाणी रस्त्यावर येत असून त्यामुळे महामार्गाच्या कडेला आणि काही ठिकाणी मुख्य मार्गावरही दुर्गंधी पसरली आहे. वाहनचालक घसरड्या रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. दुचाकीस्वार घसरून जखमी झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत.हा एक मोठा चौक असुन येथून फुरसुंगी ,मांजरी ,पुणे व सोलापूर येथूनच जात आहेत .तरी देखील याकडे सर्वांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. येथे येथील चौकात सिग्नल सर्वांना जाताना या वासामुळे खुपच त्रास होत आहे . किती तरी वेळा तक्रार केली तरी पुणे महानगरपालिकेला जाग येत नाही असे येथील नागरिकांनी सांगितले . या पाण्याच्या दुर्गंधीमुळे महामार्गावरुन जाताना अवघड झाले असुन अनेक नागरिकांना या दुर्गंधीच्या पाण्यामुळे आजारी पडले आहेत .तरी लवकरात लवकर या पाण्याचा बंदोबस्त महानगरपालिकेने करावा असे सामाजिक कार्यकर्ते सागर घाडगे यांनी सांगितले.

# धायरीत मुख्य रस्त्यावर ड्रेनेजमुळे नागरिक हैराण

**यशवंत लायगुडे यांच्या पाठपुराव्याने टायगर मशीनद्वारे ड्रेनेजची साफसफाई**





> या कामासंदर्भात यशवंत लायगुडे म्हणाले, “धायरी परिसरातील नागरिक गेले अनेक दिवस या समस्येने हैराण झाले होते. सतत दुर्गंधी, घाण पाणी आणि ट्रॅफिकमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता. त्यांच्या या त्रासाला पूर्णविराम देण्यासाठी आम्ही महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर सफाईचे काम सुरू झाले. ही केवळ सुरुवात आहे, भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी आम्ही दीर्घकालीन उपाययोजनाही करणार आहोत.”

**धायरी (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे अनेक दिवसांपासून स्थानिक नागरिक त्रस्त होते. या तुंबलेल्या गटारांमधून सांडपाणी रस्त्यावर पसरत होते, त्यामुळे दुर्गंधी पसरून आरोग्याला धोका निर्माण झाला होता. तसेच, रस्त्यावर साचलेल्या घाण पाण्यामुळे वाहनधारकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत होता. या ठिकाणी वारंवार ट्रॅफिक जाम होण्याच्या घटनाही घडत होत्या.

या गंभीर समस्येकडे खडकवासला भाजप मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी लक्ष वेधून घेतले आणि पुणे महानगरपालिकेकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

त्यांच्या पाठपुराव्यानंतर अखेर महापालिका प्रशासनाने टायगर मशीनच्या सहाय्याने ड्रेनेज लाईनची सफाई करण्याचे काम सुरू केले आहे.

यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांनी यशवंत लायगुडे व पुणे महानगरपालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे, व परिसर स्वच्छ राहावा यासाठी लायगुडे यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करून तातडीची कारवाई घडवून आणली.

पावसाळ्यात अशा समस्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेता, वेळेवर झालेली ही कारवाई परिसरासाठी दिलासादायक ठरत आहे. नागरिकांनीही प्रशासनासोबत सहकार्य करत परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
· ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate · Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. · Mobile No-7276314142 · Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) · E-mail-aparvinfo@gmail.com · Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.